DAY — **16** SEAT NUMBER | | | | | | |

2025	III	04	1500	**J-401**	(M)

BEAUTY THERAPIST (G6)

Time : 3 Hrs. **(4 Pages)** **Max. Marks : 80**

सूचना : *(१) सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.*

(२) आवश्यक त्या ठिकाणी सुबक व नामनिर्देशित आकृती काढा.

(३) उजवीकडील अंक प्रश्नांचे पूर्ण गुण दर्शवितात.

(४) सर्व प्रश्नांच्या उत्तराचा प्रारंभ नवीन पानांवर करावा.

प्र. १. **(अ)** रिकाम्या जागी योग्य पर्याय लिहून विधाने पूर्ण करा व वाक्ये पुन्हा लिहा : (५) **[२०]**

(१) 'रो' म्हणजे ------ पद्धतीच्या सेलची रचना होय.

(अ) आडव्या

(ब) उभ्या

(क) तिरप्या

(ड) गोल

(२) कोणत्याही व्यवसायात ----- घटक असतात.

(अ) जोखमीचे

(ब) आवडीचे

(क) निवडीचे

(ड) सवडीचे

(३) पापण्यांच्या मेकअपसाठी ------ हे प्रसाधन वापरतात.

(अ) आय लायनर

(ब) आयशॅडो

(क) काजळ

(ड) मस्कारा

(४) रुजला ------ देखील म्हणतात.

(अ) रुजर

(ब) ब्लशर

(क) ब्लेंडर

(ड) रुजलर

(५) चेहऱ्यावरील इलेक्ट्रिकल उपचारांना ------ असे ही म्हणतात.

(अ) गॅल्व्हॅनिक

(ब) हाय फ्रिक्वेन्सी

(क) कॉस्मेटिक इलेक्ट्रोथेरपी

(ड) मायक्रो करंट

(ब) खालील 'अ' गटांतील शब्दांच्या 'ब' गटातील शब्दांशी योग्य जोड्या जुळवा : (५)

'अ' गट	'ब' गट
(अ) कृषी उद्योजक	(१) पर्यावरणीय अडथळा
(ब) कच्च्या मालाचा अभाव	(२) आय लायनर
(क) डोळ्यांचा मेकअप	(३) उद्योजक प्रकार
(ड) स्टीमिंग	(४) चांगला संवाद
(इ) रिसेप्शनिस्ट	(५) ब्लॅक हेड काढणे

(क) खालील विधाने 'बरोबर' आहेत की 'चूक' ते लिहा : (५)

(१) यशस्वी उद्योजकाच्या अंगी आत्मविश्वास असणे आवश्यक आहे.

(२) मेकअप रिमुव्ह करण्यासाठी कंसिलर वापरतात.

(३) इलेक्ट्रिक ब्रश त्वचा खोल साफ करण्यासाठी वापरतात.

(४) शरीरातील लिम्फॅटिक सिस्टिममध्ये लसीका वाहिन्या आणि नोड्सचे मोठे नेटवर्क असते.

(५) क्लायंटला पहिली छाप स्टोरेज एरियामध्ये मिळते.

(ड) खालील प्रश्नांची प्रत्येकी फक्त 'एका' वाक्यात उत्तरे लिहा : (५)

(१) रंगचक्रातील प्राथमिक रंग कोणते आहेत?

(२) बिंदी हे कशाचे प्रतीक आहे?

(३) लिम्फॅटिक ड्रेनेज फेशियल मशीन कशासाठी मदत करते?

(४) इलेक्ट्रिक फेशियल ट्रीटमेंटमध्ये स्किनच्या खोल साफ-सफाईसाठी कोणते साधन वापरतात?

(५) धूम्रपान करणाऱ्यांना कशाचा धोका असतो?

प्र. २. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा (कोणतेही चार) : **[१२]**

(१) मेकअपसाठी कलर व्हीलचे महत्त्व सांगा.

(२) मस्काराचे प्रकार सांगून माहिती लिहा.

(३) सलूनमधील कर्मचाऱ्यांनी कोणती आचारसंहिता व कोणते नियम पाळले पाहिजे?

(४) एक संघ सदस्य म्हणून प्रभावी कार्य कसे असावे?

(५) सामान्यत: मेकअपमध्ये वापरली जाणारी उत्पादने प्रसाधने कोणती?

(६) 'कृषी उद्योजक'विषयी थोडक्यात माहिती लिहा.

प्र. ३. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा (कोणतेही चार) : **[१२]**

(१) सकारात्मक दृष्टिकोन राखण्याचे कोणते मार्ग आहेत?

(२) ब्लशरचे प्रकार सांगून ब्लशर लावण्याची कृती लिहा.

(३) फेशियल स्टीमिंगमुळे होणारे फायदे लिहा.

(४) गॅल्व्हॅनिक इलेक्ट्रो-फेशियल स्कीन ट्रिटमेंटचे होणारे परिणाम लिहा.

(५) परिच्छेद याविषयी थोडक्यात माहिती द्या.

(६) स्टोरेज एरिया म्हणजेच साठवणुकीच्या जागेबद्दल माहिती लिहा.

प्र. ४. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही तीन) : **[१२]**

(१) 'सक्रिय श्रवणाचे कौशल्य' माहिती लिहा.

(२) ग्रीन जॉबचे फायदे लिहा.

(३) इलेक्ट्रिक ब्रशचे फायदे लिहा.

(४) लिपलायनर व लिपस्टिक लावण्याची पद्धती कृतीसह लिहा.

(५) रिसेप्शनिस्टच्या मुख्य जबाबदाऱ्यांमधील महत्त्वाच्या बाबी लिहा.

प्र. ५. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही तीन) : **[१२]**

(१) मेकअप काढण्याच्या तंत्रांचे प्रकार सांगून टोनर तंत्राबद्दल माहिती लिहा.

(२) प्रेझेंटेशन म्हणजे काय?

(३) पेमेंट प्रक्रिया सांगून प्रकार लिहा.

(४) रिसेप्शनिस्टचे वैयक्तिक सौंदर्य कसे असावे?

(५) ताण व्यवस्थापित करण्याचे मार्ग लिहा.

प्र. ६. (अ) खालील प्रश्नांपैकी प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा (कोणतेही एक): (६) **[१२]**

(१) आयशॅडो लावण्याची पद्धत कृतीसह लिहा.

(२) चेहऱ्यावर स्टीमिंग कशी करावी माहिती लिहा.

(ब) खालील प्रश्नांपैकी प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा (कोणतेही एक): (६)

(१) बिंदी डिझाइन प्रकार रेखाटून त्याविषयी माहिती लिहा.

(२) इलेक्ट्रिक ब्रश वापरण्याची कृती सांगून घ्यावयाची कॉन्ट्राइंडिकेशन्स दक्षता लिहा.

◆◆◆